**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक /२००७/८०३/०२**

**१) श्री रविकांत विठ्ठलराव रागीट,**
**भाग्यश्री कॅालनी रामटेक,**
**ता.रामटेक, जिल्हा नागपूर.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) जन माहिती अधिकारी तथा**
**कुलसचिव, कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय,**
**रामटेक, मौजे परसोडा. ता. रामटेक,**
**जिल्हा नागपूर.**

.

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ११.३.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.२.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. सदर अपीलाची सुनावणी दिनांक १२.७.२००७ रोजी ठेवण्यात आली होती, त्यावेळी सुध्दा अपीलकर्ता हे गैरहजर होते.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१.२००६ रोजी (१) University Act १९९७ (२) Ordinance of B.A. Civil Services (३) Statutes व विद्यापीठ अधीनियम व Statutes हे ॲकाडेमिक कौन्सिल मॅनेजमेंट कौन्सिल व चान्सलर यांनी कोणकोणत्या तारखेला मान्यता दिली याबध्दलची माहिती विशिष्ट तक्त्यामध्ये मागीतलेली दिसून येते. सदरच्या माहितीी करीता दिनांक १७.२.२००६ रोजी माहिती अधिकारी तथा कुलसचिव यांनी रुपये १०००/- अनामत म्हणून जमा करावी, असे पत्र दिलेले दिसून येते. परंतु, सदरच्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २२.२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्याच दिवशी राज्य माहिती आयोगाकडे म्हणजे दिनांक २२.२.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानंतर मात्र प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक

२८.३.२००६ रोजी देण्यात आलेला आहे. व सदरच्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना रुपये ९४/- हे छायांकित प्रति, स्पीड पोस्ट चार्जेस व इर्न्फामेशन अर्ज याचा खर्च भरावयास सांगितल्याचे आदेश दिलेले दिसून येते. व त्याप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे, असे माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. परंतु, त्यांनी रुपये ९४/- चा अद्याप पर्यंत भरणा केलेला नाही.

३. सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये खुलासा करताना माहिती अधिकारी तथा कुलसचिव यांनी असा खुलासा केला आहे की, " द्वितीय अपीलाची तारीख व प्रथम अपीलाची तारीख ही एकच आहे व ती दिनांक २२.२.२००६ आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २९.३.२००६ रोजी दिलेला आहे. व यावरुन असे दिसून येते की, I) प्रथम अपीलाचा निर्णय येण्यापुर्वीच द्वितीय अपील दाखल केलेले आहे. वस्तुतः पहिल्या अपीलाच्या कालावधी नंतर दोन महिने किंवा निर्णय प्राप्ती यानुसार द्वितीय अपील करावयास पाहिजे होते. व त्यामुळे विश्वविद्यालयाचा पहिल्या अपीलातील वेळेतील निर्णय कळण्याआधि दूसरे अपील रद्य ठरायला हवे कारण प्रथम अपीलाच्या निर्णयात जी माहिती पुरविली असेल तर तीचा कोणताच उल्लेख त्याआधी केलेल्या द्वितीय अपीलात राहूच शकणार नाही. त्यामुळे दूस-या अपीलातील मुद्दे व्यर्थ ठरतील.

II) विश्वविद्यालयाने रुपये १०००/- ही ठेव म्हणून मागीतली होती. परंतु ती तक्रारकर्त्याने भरली नाही. प्रत्यक्ष कागदपत्रांचा खर्च रुपये १२२/- देखील भरला नाही. असे एकुण रुपये १२२/- विश्वविद्यालयाला मिळाले नाही. तरी देखील विश्वविद्यालयाने संबंधिताला माहिती पुरविलेली आहे.

III) ज्या प्रथम अपीलय निर्णयासोबत माहिती पाठविली तो निर्णय मिळाल्याचे तक्रार कर्ता मान्य करतो परंतु त्यासोबत पाठविलेली माहिती मिळाली नाही असे विधान करतो. हे विधान सत्याला पुर्णतः सोडून आहे. कारण विश्वविद्यालयाच्या परीक्षांचे अधियिम या बाबी सार्वजनिक आहेत. सर्व परीक्षा या अधिनियमांनीच चालतात. त्यामुळे अधिनियम सहजप्राप्य असतात.

IV) आयोगाने या बाबीकडे लक्ष द्यावे की, ज्या अभ्यासक्रमांच्या अधिनियमांची माहिती तक्रारकर्त्याने मागीतली आहे ते अभ्यासक्रम तक्रारकर्त्यांच्या महाविद्यालयात आरंभापासून सुरु आहेत व या अभ्यासक्रमांच्या अनेक बॅचेस त्यांच्या

महाविद्यालयामधून बाहेर पडल्या आहेत. तक्रारकर्ता अभ्यासक्रम चालवित आहे पण तो परीक्षेच्या दृष्टीने कसा चालवावा याची मात्र माहिती नाही असे अज्ञान प्रकट करत असेल तर तो वंचनेचा प्रयत्न आहे. संबंधित अभ्यासक्रमांचे अधिनियम तक्रारकर्त्यांकडे आहेत व माहितीच्या अधिकारात मागितले असता ते विश्वविद्यालयाने पुनश्च पुरविले आहेत. त्यामुळे ते मिळाले नाही असे म्हणणे धादांत असत्य आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे मागितलेली ही संपूर्ण माहिती विश्वविद्यालयाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे आणि विश्वविद्यालयाचा वेबसाईट क्रमांक हा सार्वजनिक आहे.( www.sanskrit uni.net) व त्यामुळे प्रथम अपीलाच्या दिवशीच द्वितीय अपील करुन कायद्याचे उल्लंघन करण्याबध्दल व निर्रथक आयोगाच्या संपुर्ण न्यायप्रणालीची थट्टा, कालापव्यय आणि श्रमापव्यय करण्याबाबत तक्रार कर्त्यावर स्मरणीय कार्यवाही होणे आवश्यक आहे. अन्यथा माहिती मागणा-यांकडून या कायद्याचा दुरुपयोग होत राहील. (२) यापूर्वी दिलेल्या माहिती बध्दल तक्रार कर्त्याने विश्वविद्यालयाला आलेला रुपये १२२/- खर्च विश्वविद्यालयात जमा करण्याबाबत कृपया आदेश द्यावेत ही विनंती. (३) हे द्वितीय अपील खारीज करावे, ही विनंती असा खुलासा दिलेला दिसून येतो.

४. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील हे प्रथम अपीलाच्या निर्णया विरुध्द दाखल करण्याची तरतूद आहे. व त्यामुळे सकृत दर्शनी अपीलकर्ता यांनी आयोगाकडे दाखल केलेले अपील मेमो याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सुध्दा अधिनियमाचे कलम १९ (१) अन्वये दिनांक २२.२.२००६ रोजी अपील दाखल केले आहे. व त्यामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी किंवा प्रथम अपीलाच्या निर्णयाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा उल्लेख केलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराच्या संबंधातच अपीलाच्या कालावधीची परीगणना करण्यात आलेली दिसून येते. व प्रथम अपील सुध्दा दिनांक २२.२.२००६ रोजी दाखल केलेले आहे. व प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २८.३.२००६ रोजी देण्यात आलेला असल्यामुळे प्रथम अपीलाच्या निर्णया विरुध्द द्वितीय अपील नसल्यामुळे आदेशा प्रमाणे

माहिती दिल्याचा उल्लेख हा आयोगा पुढील अपीलात नसल्यामुळे सकृत दर्शनी अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे, हा माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद बरोबर दिसून येतो तसेच ॲफिडेव्हीटमध्ये अपीलकर्ता यांना अपीलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाबध्दल शपथपत्र दाखल केलेले आहे. ज्या निर्णयाविरुध्द द्वितीय अपील नाही. मात्र ॲफिडेव्हीटमध्ये प्रथम अपीलाच्या दिवशी ि,तीय अपील दाखल करण्याची कारणे दिलेली नाहीत. अधिनियमाच्या तरतूदी जशा जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांना लागू आहेत तशा त्या अपीलकर्ता अर्जदाराला सुध्दा लागू आहेत.

५. जन माहिती अधिकारी यांनी मागीतलेल्या माहितीच्या बध्दल जो खुलासा केलेला आहे तो खुलासा सुध्दा वस्तुस्थितीस धरुन योग्य आहे, असे दिसून येते. अपीलकर्ता हे महाविद्यालयाचे व्यवस्थापन करतात असे दिसून येते व महाविद्यालय हे विश्वविद्यालयाशी संलग्न असल्याशिवाय व संलग्नतेच्या वेळेस सर्व नियम व अधिनियम यांची माहिती असल्याशिवाय महाविद्यालयाची संलग्नता मिळू शकत नाही. व त्यानंतरही विश्वविद्यालयाच्या अभ्यासक्रमाप्रमाणे अनेक परीक्षा त्या महाविद्यालयाने घेतलेल्या दिसून येतात. व यावरुनही आधीच महाविद्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती ही विश्वविद्यालयाला मागणे याबाबत अर्थातच कारण जरी विचारता येत नसले तरी हेतूचा विचार करणे आवश्यक आहे. तसेच अधिनियमाचे कलम ४ प्रमाणे जी प्रसिध्द करता येईल ती माहिती प्रसिध्द केली असल्यास उपलब्ध होण्यास सुलभ होईल म्हणून प्रसिध्द करावी व त्याप्रमाणे विश्वविद्यालयाचा वेब साईट क्रमांक .( www.sanskrit uni.net) यावर उपलब्ध आहे. त्यामुळे सदरची माहिती माहितीच्या अर्जाच्या माध्यमातून मागणे हे सुध्दा अधिनियमाच्या तरतुदींशी सुसंगत नाही. त्याचप्रमाणे माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९७ हा अधिनियम विद्यापीठाचा नाही. तर विधानमंडळाने पारित केलेला अधिनियमच आहे. व अधिनियम ज्या वेळेस अंमलात येतो त्या वेळेस तो शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द केलेला असतो. जे विद्यापीठाचे आदेश आहेत ते आदेश सुध्दा प्रसिध्द केलेले असतात. व तसेच जे statute आहे ते सुध्दा विद्यापीठाच्या मॅनेजमेंट कौन्सीलनी केल्यानंतर वेळोवेळी प्रसिध्द होत असते. व त्यामुळे जी माहिती

आधीच प्रसिध्द आहेत, ती माहिती मागणे या वरुन अपीलकर्ता यांचा हेतू जन माहिती अधिकारी यांचे खुलाशास पुष्टी देणारा दिसतो. जन माहिती अधिकारी तथा कुलसचिव यांनी केलेला खुलासा हा वस्तुस्थितीस धरुन आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही.

६. वास्तविक प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे त्या माहिती करीता अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा रुपये १२२/- हा करावयास पाहिजे होता. तो त्यांनी केलेला नाही. व त्यामुळे अपीलकर्ता हे स्वत: अधिनियमाच्या तरतूदींचे उल्लंघन करतात असे दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांचे आयोगा पुढील अपील हे अधिनियमाच्या कलम १९ (३) प्रमाणे नसल्यामुळे खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ११.३.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,**
**नागपूर.**